| 8 | **Mr. Masood Abdul Hamid Dhalwelkar**,<br>S/O Mr. Abdul Hamid Dhalwelkar, Flat No. 6, Kanchan Ocean View, Near Govt. Rest House, Mirkarwada, Zadgaon, PO Ratnagiri, Dist Ratnagiri - 415612<br>**Mrs. Sarika Masood Dhalwelkar**,<br>W/O Mr. Masood Abdul Hamid Dhalwelkar, Flat No. 6, Kanchan Ocean View, Near Govt. Rest House, Mirkarwada, Zadgaon, PO Ratnagiri, Dist Ratnagiri - 415612 | 06/04/2021<br>30/09/2017<br>Term Loan - Home Loan Term Loan - Car Loan | **Rs. 13,89,400.00 (Rupees Thirteen lakh Eighty Nine Thousand Four Hundred only)** as on 06.04.2021 (inclusive of interest up to 31.03.2021). | 1) All that piece & parcel of residential flat no. 6 admeasuring 369 sq. ft. carpet area (535 sq. ft built up) located in the building - KANCHAN OCEAN VIEW situated at S. No. 143, Hissa no. 18 at Mouje - Zadgaon. Mirkarwada, Ratnagiri within the municipal limits of Ratnagiri, Tal. Dist. Ratnagiri registered in the name of Mr. Masud Abdul Hamid Dhalwelkar, which is bounded as under:<br>On or towards East : Open space, On or towards West : Flat no. 10, On or towards North: Open space, On or towards South: Stair<br>The Property is bounded as:<br>On or towards East : Part of the S. No. 143. Hissa No. 5, 8, 1, On or towards West : Municipal Road, On or towards North: Part of the S. No. 143, Hissa No. 1A, On or towards South : Part of the S. No. 143, Hissa No. 1C<br>2) Hypothecation of Mahindra & Mahindra Ltd make Bolero Pickup Four wheeler bearing Regn.no. MH-08-W-3741, Engine no. GHE1M74738. Chassis no. MA1ZN2GHKE1M89727 registered in the name of Mr. Abdul Hamid Dhalwelkar |
| 9 | **Mr. Mohammad Faruk Dawood Memon**<br>S/O Dawood Alimohammad Memon, Flat No. 208, B-Wing, Solar Green Apartment, Near Kokan Nagar, Majgaon Road, Ratnagiri - 415639<br>**Mrs. Rijwana Mohammad Faruk Memon**<br>W/O Mohammad Faruk Dawood Memon, Flat No. 208, B-Wing, Solar Green Apartment, Near Kokan Nagar, Majgaon Road, Ratnagiri - 415639<br>**M/S National Footwear,** Prop. Mr. Mohammad Faruk Dawood Memon, Zarni Road, Ratnagiri 415612 | 26/02/2021<br>13/11/2017 & 30/04/2016<br>Term Loan - Home Loan Cash Credit - Trader Loan | **Rs. 28,00,740.00 (Rupees Twenty Eight lakh seven Hundred Fourty only)** as on 26.02.2021 (inclusive of interest up to 31.01.2021). | 1) All that piece & parcel of residential flat admeasuring 635 sq. ft. bearing Flat No. B-208 located on the 2nd Floor of B-wing building known as SOLAR GREEN which is constructed under Survey no. 27D/10 at Village Mouja Tiwandewadi with the area of Grampanchayat Shirgaon, Tal. Dist. Ratnagiri registered in the name of Mr. Mohammad Faruk Dawood Memon which is bounded as under:<br>On or towards East : Flat No. 207, On or towards West : Flat no. 201, On or towards North : Passage and Flat No. 204, On or towards South : Garden/ Compound wall open space.<br>2) All stocks of footwear in the shop. |
| 10 | **Mrs. Radhika Rushikesh Pawar**<br>W/O Rushikesh Rajendra Pawar, House No. 166-A, Nivkhol, Opp. Municipal Sentex Water Tank, Ratnagiri - 415612<br>**Mr. Rajendra Anant Pawar**<br>S/O Anant Pawar, House No. 166-A, Nivkhol, Opp. Municipal Sentex Water Tank, Ratnagiri - 415612 | 19/04/2021<br>31/05/2016<br>Term Loan | **Rs. 10,61,267.00 (Rupees Ten lakh Sixty One Thousand Two Hundred Sixty Seven only)** as on 19.04.2021 (inclusive of interest up to 31.03.2021). | All that piece & parcel of residential plot of land admeasuring 300.00 Sq. Mtrs. and building constructed thereon situated under Survey (Bhumapan) No. 61. Hissa (Upavibhag) No. 2/1/7+2/2/12+A2/4 at village/ mouje - Madhaliwadi (Old Mirjole) near Railway Station within Mirjole Gram Panchayat, Tal. & Dist. Ratnagiri and within Registering Taluka & District Ratnagiri. Office of Sub-registrar, Ratnagiri. the area of Grampanchayat Shirgaon, Tal. Dist. Ratnagiri registered in the name of Mr. Rajendra Anant Pawar vide Sale Deed doc no. 1192/1989 dated 10.08.1989 executed at the office of Sub-registrar, Ratnagiri. The property is bounded as under:<br>On or towards East : Land bearing Hissa No. 2/1/7+2/2/12A2, On or towards West : Road, On or towards North : Road, On or towards South : Land bearing Hissa No. 2/1/7+2/2/12A2, |
| 11 | **Mr. Samir Ashok Khade**<br>S/O Ashok Ganpat Khade, House No. 442-A, Ganeshwadi, Shirgaon, Ratnagiri - 415629<br>**Mr. Ashok Ganpat Khade**<br>S/O Ganpat K. Khade, House No. 442-A, Ganeshwadi, Shirgaon, Ratnagiri - 415629<br>**Mr. Santosh Govind Rewale - Guarantor**<br>S/O Govind Bapu Rewale, 22, Kondavadi, Fanasavale, Vill - fanasavale, Ratnagiri - 415612 | 06/04/2021<br>30/07/2016<br>Term Loan | **Rs. 15,68,306.00 (Rupees Fifteen lakh Sixty Eight Thousand Three Hundred Six only)** as on 06.04.2021 (inclusive of interest up to 31.03.2021). | All that piece & parcel of residential house no. 442-A admeasuring 70.54 sq. mtr. built up area bearing constructed on S. No. 90, H. No. 1/1C at Village Mouja - Ganeshwadi, Shirgaon near Ganesh Mandir, Ratnagiri within the limits of Shirgaon Gram Panchyat & Tal. Dist. Ratnagiri which is registered in the name of Mr. Ashok Ganpat Khade vide Sale Deed no. 299/1987 date 29.05.1987 and is bounded as under:<br>On or towards East : Road 6.10 mtrs. width, On or towards West : Property owned by Parvati Sankar Payare, On or towards North : Property owned by Parvati Sankar Payare, On or towards South : Property owned by Varekar. |
| 12 | **Mr. Deepak Prabhakar Keer**<br>S/O Prabhakar Sitaram Keer, House No. 60, Karandhikar Wadi, At Mirzole, PO Ratnagiri 415639<br>**Mr. Chandrashekhar Amarnath Shinde - Guarantor**<br>S/O Amarnath Shinde, 2/239, Sai Nagar, Kuwarbav, PO Ratnagiri, Ratnagiri 415612 | 19/04/2021<br>31/10/2016<br>Term Loan | **Rs. 9,88,775.00 (Rupees Nine lakh Eighty Eight Thousand Seven Hundred Seventy Five only)** as on 19.04.2021 (inclusive of interest up to 31.03.2021). | All that piece & parcel of residential house no. 60 constructed on land having 510.00 sq. mtr. area under S. No. 10/1/1K i.e., Bhumapan no. 10, Upavibhag - 1/1K which is situated at Village/ Mouja - Mirjole, Ratnagiri within the limits of Mirjole Gram Panchayat and Registering Taluka & District Ratnagiri, Office of Sub-registrar, Ratnagiri. |

If the concerned Borrowers shall fail to make payment to **UCO Bank, Ratnagiri Branch** as aforesaid, then the **UCO Bank, Ratnagiri Branch** shall proceed against the above secured assets under Section 13 (4) of the Act and the applicable Rules entirely at the risks of the concerned Borrowers to the costs and sequences.The concerned Borrowers are prohibited by the SARFAESI Act to transf

# मराठा आरक्षणाचा निर्णय घ्या, अन्यथा पावसाळी अधिवेशन उधळून लावणार

## प्रसाद लाड यांचा सरकारला इशारा

**मुंबई, दि.१६ (प्रतिनिधी)**: राज्यातील महाआघाडी सरकारने येत्या दि. ५ जुलैला होत असलेल्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनांपूर्वी मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेतला नाही तर आम्ही हे अधिवेशन अजिबात होऊ देणार नाही, अशा इशारा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आमदार प्रसाद लाड यांनी बुधवारी दिला.

छत्रपती संभाजीराजे यांच्या नेतृत्वाखाली राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या समाधीस्थळावर मराठी आरक्षणासाठी सुरु असलेल्या आंदोलनाला भारतीय जनता पक्षाचा सशर्त पाठिंबा आहे. पण मराठा समाजाचा कार्यकर्ता आणि आमदार म्हणून माझादेखील पाठिंबा असल्याचे स्पष्ट करताना राज्य सरकारने याबाबत तत्काळ निर्णय घेण्याचे आवाहन प्रसाद लाड यांनी केले. पुढे प्रसाद लाड म्हणाले की, ''आता सरकारने डोळे उघडले नाही तर मराठा समाज पेटून उठेल आणि याचे परिणाम या राज्य सरकारला भोगावे लागतील. राज्यातील आघाडी सरकारने तत्काळ याबाबत निर्णय घ्यावा. विधानसभेचे येत्या दि. ५ जुलैला होत असलेल्या अधिवेशनापूर्वी मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत सरकारने तत्काळ निर्णय घेतला नाही तर हे अधिवेशन आम्ही अजिबात चालू देणार नाही.''

मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी, हितासाठी आणि आरक्षणासाठी आम्ही संपूर्णपणे समाज म्हणून या सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरण्यासदेखील कमी करणार नाहीत. आता हे मूक निदर्शने आहेत. या मूक निदर्शनाचे परिवर्तन संघर्षात झाले, संघर्षाचे परिवर्तन आंदोलनात झाले आणि आंदोलनाचे परिवर्तन हिंसेत झाले तर याला संपूर्णपणे महाआघाडी सरकार जबाबदार असेल, असा निर्वाणीचा इशारा आपण या सरकारला देत आहोत. असेही प्रसाद लाड यांनी म्हटले आहे.

# मुंबई 'मेट्रो ३' रखडणार?

## मुख्यमंत्र्यांनी मेट्रोच्या चौथ्या टप्प्याचा निधी नाकारला

**मुंबई, दि.१६ (प्रतिनिधी) :** मागील दीड वर्षांपासून देशभरात थैमान घातलेल्या कोरोनामुळे मुंबईतील कुलाबा- वांद्रे-सीप्झ या 'मेट्रो ३' मार्गाच्या कामाला फटका बसलेला आहे. सदरील प्रकल्पाची किंमत २३ हजार, १३६ कोटीवरून आता ३३ हजार, ४०६ कोटींच्या घरात पोहोचलेली आहे. मेट्रो प्रकल्पासाठी जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्था (जेआयसीए) गेल्या चार महिन्यांपासून निधीचा चौथा टप्पा देण्यास तयार आहे. निधीबाबतचे पत्रदेखील जपानच्या राजदूत सुझुकी संतोषी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना देण्यात आलेले आहे. मात्र, जपान सरकारच्या या पत्राला मुख्यमंत्र्यांकडून आतापर्यंत उत्तर देण्यात न दिल्याने मुंबईतील बहुचर्चित 'मेट्रो ३'चा प्रकल्प रखडण्याची चिन्हं दिसून येत आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा ३३.५ किलोमीटर लांबीचा भुयारी मार्ग आहे. या मार्गावर २७ स्थानके असून त्यापैकी २६ स्थानके भूमिगत आणि १ स्थानक जमिनीवर आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत २३ हजार, १३६ कोटी रुपये आहे. या प्रकल्पासाठी जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्थेने (जेआयसीए) अल्प व्याजदराने १३ हजार, ३२५ कोटी रुपये कर्ज देत भारताला सहकार्य केले. प्रकल्पासाठी लागणारा उर्वरित निधीची व्यवस्था भारत सरकार, महाराष्ट्र सरकार व इतरांच्या संयुक्त विद्यमाने करण्याचे ठरवण्यात आले होते. या मेट्रो प्रकल्पासाठी आतापर्यंत जपानच्या संस्थेने तीन टप्प्यांमध्ये १३ हजार, ३२५ कोटी रुपये उपलब्ध दिलेले आहेत. मात्र, आता या प्रकल्पाची किंमती आता ३३ हजार, ३०४ कोटीवर जाऊन पोहोचली. त्यासाठी ६ हजार, ५०० कोटींच्या अतिरिक्त निधीसाठी जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेने सहमतीदेखील दिलेली आहे. याबाबतचे एक पत्र जपानच्या राजदूत सुझुकी संतोषी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना काही दिवसांपूर्वी पाठवले होते. मात्र, जपान सरकारतर्फे देण्यात आलेल्या या पत्राला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अद्यापही सहमती दर्शवलेली नाही.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या 'मेट्रो-३' मार्गाच्या कामाला कोरोनाचा फटका बसला आहे. या मार्गाचा सीप्झ ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबर २०२१ मध्ये प्रवाशांच्या सेवेत येणार होता. परंतु कोरोनामुळे नियोजित कामे पूर्ण होऊ न शकल्याने पहिल्या टप्प्याची 'डेडलाईन' पुन्हा वाढली आहे. पहिला टप्पा सप्टेंबर २०२२, तर दुसरा टप्पा मार्च २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा आहे. मात्र कोरोनामुळे कामामधील अडचणी वाढल्यास पुन्हा 'डेडलाईन' वाढण्याची शक्यता 'एमएमआरसी'च्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केल्यामुळे मेट्रोचे आगमन लांबणीवर पडू शकते. विशेष म्हणजे गेल्या चार महिन्यांपासून जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्था निधीचा चौथा टप्पा देण्यास तयार असतानाही ठाकरे सरकार त्याबाबत कृतिशील दिसत नसल्यामुळे 'मेट्रो ३' प्रकल्प रखडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

# राजकीय आरक्षणाचा प्रश्न सुटला नाही तर छगन भुजबळ राजीनामा देणार का? : दरेकर

**मुंबई, दि.१६ (प्रतिनिधी)**: ''ओबीसी समाजाच्या आरक्षणावरून राज्यातील सत्तेत सहभागी असलेले मंत्री छगन भुजबळ यांच्या संघटनेने सरकार विरोधात आंदोलनाचा पवित्रा घेतला, याचा अर्थ त्यांचा सरकारवर विश्वास नाही. मग ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाचा प्रश्न सरकारने सोडवला नाही, तर मंत्रिपदाचा राजीनामा देण्याचे धाडस छगन भुजबळ दाखवतील का,'' असा थेट सवाल विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रविण दरेकर यांनी केला.

आरक्षणासाठी मराठा समाजाने मूक मोर्चाला सुरुवात झाल्यानंतर त्या पाठोपाठ ओबीसी समाजही आरक्षणासाठी रस्त्यावर उतरण्याची शक्यता निर्माण झाले आहे. समता परिषदेचे सर्वेसर्वा आणि राज्यातील मंत्री छगन भुजबळ या मोर्चाचे नेतृत्व करणार आहेत. सध्या यावरूनच राज्यात जोरदार राजकारणाला सुरूवात झाली आहे. राजकीय आरक्षणाच्या विषयावर बोलताना दरेकर म्हणाले की, छगन भुजबळ राज्यातील एक प्रमुख नेते असून सरकारमधील ज्येष्ठ मंत्रीसुद्धा आहेत. कॅबिनेटमध्ये अथवा मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून ओबीसी समाजाच्या आरक्षणासंदर्भात योग्य भूमिका घेण्याची आवश्यकता होती, पण दुर्दैवाने ते होताना दिसत नाही. ओबीसीच्या खांद्यावर बंदूक ठेऊन राजकारण साधण्याचा हा प्रयत्न आहे. जर आपल्या समाजाविषयी एवढी कदर असेल, ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाचा प्रश्न सरकराने सोडवला नाही, तर मंत्रिपदाचा राजीनामा देण्याचे धाडस मंत्री छगन भुजबळ दाखवतील का, असा खोचक सवालही दरेकर यांनी उपस्थित केला.

कोल्हापूर येथे झालेल्या मूक आंदोलनावरून दरेकर म्हणाले की, ''छत्रपती सांभाजीराजे यांचा सर्व पक्षांनी, नेत्यांनी सन्मान केला. सर्व नेत्यांनी आपापल्या भूमिका आंदोलनस्थळी मांडल्या. आंदोलनात भूमिका मांडून मार्ग निघाला का? आरक्षण प्रश्नावर प्रत्यक्षात मार्ग काढण्यासाठी ते व्यासपीठनव्हते. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार किंवा उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण आंदोलनस्थळी आले असते, तर मराठा संदर्भात निर्णय घेऊ शकले असते. परंतु आंदोलनाची सुरुवात म्हणून या विषयी संवाद झाला, यातून काय निष्पन्न होत आहे, मुख्यमंत्री चर्चेसाठी वेळ देणार आहे, मग चर्चे साठी वेळ देण्यासाठी हे केवळ आंदोलन होते का ? किंबहुना या ठिकाणी घटना दुरुस्तीची आवश्यकता आहे हे सांगण्यासाठी आंदोलन होते का ? या सर्व गोष्टी सर्व लोकांना माहीत आहे.''

## सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वाटप

**मुंबई :** मुंबई भाजपचे अध्यक्ष व आमदार मंगलप्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनानुसार गिरगावातील हाऊसगल्ली व रस्त्यांची साफसफाई करणाऱ्या घनकचरा विभागाच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना पावसापासून सुरक्षा करण्यासाठी प्रभाग क्र. २१८ च्या नगरसेविका डॉ.प्रा.अनुराधा विजय पोतदार यांच्या हस्ते रेनकोट वाटप करण्यात आले. यावेळी मुंबई महापालिकेच्या 'डी' विभागाचे अधिकारी जगताप हे उपस्थित होते.

**मुंबई :** अथर्व फाउंडेशनतर्फे बोरीवली विभागातील एमएचबी कॉलनी, कस्तुरबा मार्ग, कांदिवली, चारकोप आणि बोरिवली (प) पोलिस स्थानकांमध्ये अद्ययावत दोन संगणकांचे प्रत्येकी दोन संच, एक प्रिंटर, संगणकासाठी स्पीकर व वेब कॅमेरा या सर्व वस्तूंच्या वितरणाचा उपक्रम बुधवार, दि.१६ जून रोजी बोरीवलीतील मेगा थ्रील हॉल, शिंपोली रोड येथे पार पडला. यावेळी बोरीवलीचे आमदार आणि अथर्व फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील राणे व संबंधित पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते.

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाचा मार्ग अखेर मोकळा

## ७ गावांतील ग्रामस्थ पुनर्वसनासाठी तयार

**मुंबई, दि. १६ (विशेष प्रतिनिधी)**: सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा (कोअर) क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला आहे. कोयनेच्या खोऱ्यातील वेळे आणि देऊर या गावातील ग्रामस्थ हे पुनर्वसनासाठी तयार झाले आहेत. शिवाय इतरही पाच गावे पुनर्वसनासाठी तयार झाल्याने सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे गाभा क्षेत्र हे वन्यजीवांच्या अधिवासच्या दृष्टीने सुरक्षित आणि मोकळे होणार आहे.

कोयना आणि चांदोली अभयारण्याचे संरक्षित क्षेत्र मिळून २०१० मध्ये सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. हा व्याघ्र प्रकल्प १,१६६ चौ.किमी क्षेत्रावर पसरलेला असून याचे गाभा क्षेत्र ६००.१२ चौ.किमी आणि कवच क्षेत्र ५६५ चौ. किमी क्षेत्रावर आहे. व्याघ्र प्रकल्पातील वनसंपत्तीचे संवर्धन आणि संरक्षणाच्या दृष्टीने संरक्षित क्षेत्रामधील गावांचे पुनर्वसन

आवश्यक आहे. मात्र, या प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील सात गावांचे पुनर्वसन झाले नव्हते. आता या पुनर्वसानातील अडथळे दूर झाले आहेत. कोयना अभयारण्यातील बामणोली वनपरिक्षेत्रामध्ये वेळे आणि देऊर या गावांचे पुनर्वसन झाले नव्हते. परंतु, आता ही गावे पुनर्वसनाकरिता तयार झाल्याची माहिती साताऱ्याचे उपवनसंरक्षक महादेव मोहिते यांनी दिली. वेळे आणि देऊर गावाचे पुनर्वसन हे भोपेगाव येथील वनजमिनीवर करण्यात येणार असल्याची माहिती कोल्हापूरचे मुख्य वनसंरक्षक डॉ. व्ही.क्लेमेंट बेन यांनी दिली. हे पुनर्वसन वनजमिनीवर होणार असल्याने त्यासाठी केंद्राची परवानगी आवश्यक असल्याने यासंबंधीचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवणार असल्याचे त्यांनी सांगितले. वेळे या गावात ६१ कुटुंब आणि देऊरमध्ये २८ कुटुंब वास्तव्यास आहेत. या दोन गावांव्यतिरिक्त चांदोली अभयारण्यातील मळे, कोळणे, पाठारपुंज, खुंडलापूर आणि जनाईवाडी या गावांचे पुनर्वसनही होणार असल्याची माहिती मोहिते यांनी दिली. यागावांचे पुनर्वसनही वनजमिनीवर होणार आहे. त्यामधील खुंडलापूरचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला असून उर्वरित गावांचा प्रस्ताव या महिन्यामध्ये केंद्राला पाठवणार असल्याचे बेन यांनी सांगितले. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रामध्ये केवळ या सात गावांचे पुनर्वसन राहिले होते. आता ते होणार असल्याने येथील वन्यजीवांचा भ्रमणमार्ग सुरक्षित होऊन वनक्षेत्र मोकळे होणार असल्याचे मोहिते म्हणाले.

## डॉ. सौरभ सांगोरे यांची भाजप वैद्यकीय आघाडीवर नियुक्ती

**मुंबई, १६ (प्रतिनिधी) :** बोरिवली पश्चिमेतील 'फिनिक्स' रुग्णालयाचे अध्यक्ष नामवंत डॉ. सौरभ सांगोरे यांची भाजप उत्तर मुंबई वैद्यकीय आघाडीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. उत्तर मुंबई भाजपचे जिल्हाध्यक्ष गणेश खणकर यांनी खा.गोपाळ शेट्टी आणि उत्तर मुंबईतील सर्व आमदार व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.सांगोरे यांची निवड जाहीर केली आहे.

# कोरोना आकडेवारीत पारदर्शकता का नाही ?

## भाजप प्रदेश सचिव दिव्या ढोले यांचा सवाल

**मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) :** राज्य सरकारच्या संकेतस्थळावर जिल्हानिहाय देण्यात आलेली कोरोनासंबंधीची आकडेवारी आणि माहिती ही अपुरी आहे. राज्य सरकारतर्फे देण्यात असलेली माहिती अपूर्ण असून आजच्या घडीला ही माहिती सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध असणे गरजेचे आहे. मात्र, ती आकडेवारी जनतेला देण्यात येत नसून कोरोना आकडेवारी देण्यात पारदर्शकता का नाही, असा सवाल भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश सचिव दिव्या ढोले यांनी राज्य सरकारला केला आहे. भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. राज्य सरकारचा कारभार किती गलथान पद्धतीने चालतो ते पुन्हा एकदा सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावरून दिसून आले आहे. आजमितीला राज्यात जिल्हानिहाय कोरोनाचे किती रूग्ण आहेत, किती रूग्णालयात किती खाटा उपलब्ध आहेत, मृतांची संख्या काय आहे, अशी अधिकृत माहिती

परिपूर्ण स्वरूपात सरकारच्या संकेतस्थळावर उपलब्ध नाही. या संकेतस्थळावर ३६ जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यांची संकेतस्थळे बंद आहेत. यामध्ये मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, सातारा आणि जळगाव जिल्ह्यांचा समावेश आहे. मागील एक-दीड वर्षापासून बंद असलेली ही संकेतस्थळे अद्याप सुरू झालेली नाहीत. जर संकेतस्थळे बंद आहेत तर राज्य सरकारला या जिल्ह्यातली माहिती कोणत्या पद्धतीने मिळत आहे? या पाच जिल्ह्यातली संकेतस्थळे सुरू करण्यासंबंधित सरकारकडून का पाठपुरावा केला जात नाही, असा सवाल दिव्या ढोले यांनी राज्य सरकारला केला आहे.

पुढे दिव्या ढोले म्हणाल्या की, ''केवळ २० जिल्ह्यातल्या 'कोविड डॅशबोर्ड'वर अद्ययावत माहिती उपलब्ध आहे. मात्र, या सर्व जिल्ह्यातील माहिती गोळा करून ती सादर करण्यामध्ये एक समान अशी पद्धत ठेवलेली नाहीये. त्यामुळे बऱ्याचशा जिल्ह्यांची माहिती अपूरी आहे. त्यासाठी महसूल विभागाकडून आवश्यक असलेल्या माहितीचा एक समान आराखडा तयार करून देणे आवश्यक होते. मात्र, त्याकडे पूर्णत: दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. केवळ १३ जिल्ह्यांच्याच संकेतस्थळावर मृतांचे आकडे दिसून येतात. एकूणच राज्य सरकारमध्ये जो समन्वयाचा अभाव सर्वत्र दिसून येतो तोच समन्वयाचा अभाव संकेतस्थळावरील कामातून ही दिसून येतो.''

जिल्हाधिकांऱ्याकडून जी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाला दिली जाते तिच माहिती माध्यमांना दिली जाते. ही माहिती जिल्हाधिकारी संकेतस्थळावर का देत नाहीत की यामध्ये काही लपवाछपवी केली जाते, असा प्रश्न यावेळी दिव्या ढोले यांनी उपस्थित केला.

**मार्कसन्स फार्मा लिमिटेड**

**CIN:** L24110MH1992PLC066364
**नोंदणीकृत कार्यालय:** ११वा मजला, ग्रॅण्डीयर, वीरा देसाई विस्तारित मार्ग, ओशिवरा, अंधेरी, (पश्चिम), मुंबई-४०० ०५३.
**दूरध्वनी:** ०२२ ४००१ २०००; **फॅक्स क्र.:** ०२२ ४००१ २०११
**वेबसाईट:** www.marksanspharma.com;
**ईमेल:** companysecretary@marksanspharma.com

याद्वारे सूचना देण्यात येते की, मार्कसन्स फार्मा लिमिटेड ("कंपनी") च्या सदस्यांची **विशेष सर्वसाधारण सभा ("ईजीएम")** कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकारद्वारे पारित दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजीचे सर्वसाधारण परिपत्रक क्र. ३९/२०२० सह वाचावयाच्या दि. १३ एप्रिल, २०२० रोजीच्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. १७/२०२० सह वाचावयाच्या दि. ८ एप्रिल, २०२० रोजीच्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२० मध्ये उल्लेखित कार्यपद्धतीनुसार उल्लेखित कार्यपद्धती आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया द्वारे पारित दि. १५ जानेवारी, २०२१ रोजीचे परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2021/11 सह वाचावयाचे दि. १२ मे, २०२० रोजीचे परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CMD1/CIR/P/2020/79 अनुसार उल्लेखित कार्यपद्धतीसह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ ("कायदा") च्या लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत बनविलेले नियम आणि सेबी (सुचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या अनुपालनामध्ये ईजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सामायिक ठिकाणी सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय व्हिडीयो कॉन्फरान्सिंग / इतर दृक श्राव्य माध्यमांद्वारे ("व्हीसी") **शुक्रवार, दि. १ जुलै, २०२१ रोजी स. ९.०० वाजता** घेण्यात येणार आहे.

कंपनीने ईजीएम संयोजनाची सूचना ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत त्यांना दि. १६ जून, २०२१ रोजी ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविली आहे आणि म्हणून, ईजीएम सूचनेची छापील प्रत वर उल्लेखिलेल्या ई-ईजीएम परिपत्रक लक्षात घेता सदस्यांना पाठविण्यात आलेली नाही.

ईजीएम सूचना कंपनीची वेबसाईट www.marksanspharma.com वर आणि स्टॉक एक्सचेंजच्या म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाईट्स अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे उपलब्ध आहे. त्याची प्रत सीडीएसएलची वेबसाईट www.evotingindia.com येथे देखील उपलब्ध आहे.

सेबी सु.दा.प्र.आ. विनियमनाच्या विनियमन ४४ (सुधारणेनुसार) आणि दि. ०८ एप्रिल, २०२०, दि. १३ एप्रिल, २०२० आणि दि. ३१ डिसेंबर २०२० रोजीच्या एमसीए परिपत्रकांसह वाचावयाच्या कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० (सुधारणेनुसार) सह वाचावयाच्या कायद्याच्या कलम १०८ च्या तरतुदींनुसार, कंपनी तिच्या सदस्यांना ईजीएममध्ये करावयाच्या कामकाजाकरिता ईजीएमदरम्यान तसेच त्यापूर्वी रिमोट ई-मतदान सुविधा प्रदान करीत आहे. सदस्य त्यांचे मत त्यांच्या संबंधित ठिकाणांवरून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीवर देऊ शकतात आणि सभेस उपस्थित राहू शकतात. रिमोट ई-मतदान सुविधा खालील कालावधीदरम्यान उपलब्ध असेल:

रिमोट ई-मतदान सुरु होण्याचा दिनांक: **मंगळवार, दि. ०६ जुलै, २०२१ रोजी स. ०९.०० वाजता.**

रिमोट ई-मतदान समाप्त होण्याचा दिनांक: **गुरूवार, दि. ०८ जुलै, २०२१ रोजी सायं. ०५.०० वाजता.**

रिमोट ई-मतदान उपरोल्लेकित दिनांक आणि वेळेनंतर करू दिले जाणार नाही आणि ई-मतदान यंत्रणा सीडीएसएल द्वारे उपरोल्लेखित कालावधी समाप्त झाल्यावर बंद करण्यात येईल. तथापि, रिमोट ई-मतदान सुविधा शुक्रवार, दि. ९ जुलै, २०२१ रोजी ईजीएमच्या कालावधीदरम्यान उपलब्ध असेल.

कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० अनुसार, कंपनीने ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याकरिता सदस्यांची पात्रता निश्चित करण्याकरिता शुक्रवार, दि. २ जुलै, २०२१ (कट-ऑफ दिनांक) ही तारीख निश्चित केली आहे. ज्या व्यक्तींची नावे कट-ऑफ दिनांकास सदस्यांचे नोंदपट/लाभार्थी मालकांची यादी यावर येतील ते इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.

जे सदस्य कट-ऑफ दिनांकास सदस्य नसतील त्यांनी सदर ईजीएम सूचना फक्त माहितीच्या कारणास्तव पहावी.

जे सदस्य ईजीएम सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे सदस्य झाले असतील आणि त्यांची नावे कट-ऑफ दिनांकास सदस्यांचे नोंदपट/लाभार्थी मालकांची यादी यावर आलेली असतील त्यांनी ईजीएम सूचना आणि इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मत देण्याकरिता लॉगईन आयडी आणि पासवर्ड मिळविण्याकरिता निबंधक आणि हस्तांतरण एजंट यांना संपर्क साधावा.

**या सूचनेमध्ये प्रस्तावित ठरावाकरिता ई-मतदानाकरिता लॉगईन अधिकारपत्रे मिळविण्याकरिता ज्या भागधारकांचे ईमेल पत्ते डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत नसतील त्यांच्याकरिता प्रक्रिया:**

१. भौतिक भागधारकांकरिता - फोलिओ क्र., भागधारकाचे नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत (पुढील आणि मागील), पॅन (पॅन कार्डची स्कॅन केलेली स्व-साक्षांकित प्रत), आधार (आधार कार्डची स्कॅन केलेली स्व-साक्षांकित प्रत) यांरखे आवश्यक तपशील companysecretary@marksanspharma.com येथे ईमेलद्वारे पाठवावे.
२. डीमॅट भागधारकांकरिता - डीमॅट खाते तपशील (सीडीएसएल-१६ अंकी लाभार्थी आयडी किंवा एनएसडीएल-१६ अंकी डीपीआयडी + सीएलआयडी), नाव, क्लायंट मास्टर किंवा एकत्रित खाते विवरणपत्राची प्रत, पॅन (पॅन कार्डची स्कॅन केलेली स्व-साक्षांकित प्रत), आधार (आधार कार्डची स्कॅन केलेली स्व-साक्षांकित प्रत) यांरखे आवश्यक तपशील companysecretary@marksanspharma.com येथे ईमेलद्वारे पाठवावे.

ईजीएमला उपस्थित राहणे आणि सीडीएसएल ई-मतदान प्रणालीद्वारे ई-मतदान यासंबंधी तुम्हाला कोणत्याही शंका किंवा तक्रारी असल्यास, तुम्ही helpdesk.evoting@cdslindia.com यांना ईमेल लिहू शकता किंवा ०२२-२३०५८७३८ आणि ०२२-२३०५८५४२/४३ येथे संपर्क साधू शकता

**संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्या वतीने**
**मार्कसन्स फार्मा लिमिटेड**
**सही/-**
**हर्षवर्धन पाणीग्रही**
**कंपनी सचिव**

मुंबई
१६ जून, २०२१

**नवी मुंबई महानगरपालिका - आरोग्य विभाग**
**साथरोग आजार टाळण्याकरिता जाहिर आवाहन**

| आजाराचे नाव | काविळ, गॅस्ट्रो, अतिसार, हगवण (जलजन्य आजार) | स्वाईन फ्ल्यू (हवेमार्फत /Droplet) | लेप्टोस्पायरोसीस (जलजन्य आजार) |
|---|---|---|---|
| आजार कशामुळे होतो | हा जीवाणूंमुळे होणारा आजार आहे. | हा विषाणूंमुळे होणारा आजार आहे . | हा विषाणूंमुळे होणारा आजार आहे . |
| कसा पसरतो | दूषित पाणी, अस्वच्छता, माश्या. | सर्दी, खोकल्यामुळे हवेतून विषाणू दुसऱ्या व्यक्तीच्या श्वसन मार्गात शिरल्यामुळे होतो . | रोगबाधित प्राणी (मुख्यत: उंदीर, डुक्कर, गाई, म्हशी, कुत्रे) यांच्या लघवीमुळे दूषित झालेल्या पाण्यातून या आजाराचे विषाणू संसर्ग करतात |
| लक्षणे काय | ताप येणे, अतिसार, उलटया होणे, जल शुष्कतेची लक्षणे (हात पाय गार पडणे, त्वचा शुष्क पडणे) ही लक्षणे आढळतात. | ताप येणे, खोकला, घसा दुखणे, अतिसार, उलटया होणे, श्वास घेण्यास त्रास होणे ही लक्षणे आढळतात. | तीव्र ताप, डोकेदुखी, स्नायू दुखी, थंडी वाजणे, कावीळ, रक्तस्त्राव,डोळे सुजणे, अशी लक्षणे आढळतात. गंभीर रूग्णांमध्ये मूत्रपिंडाचे व यकृताचे काम बंद पडून मृत्यू ही ओढवतो |
| प्रतिबंधात्मक उपाय | सर्व केर-कचरा घंटा गाडीतच टाकावा, घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी स्वच्छ करून घ्यावी. पाईप लाईनमध्ये गळती असल्यास त्वरीत पाणी पुरवठा विभागाशी संपर्क साधावा. पिण्याचे पाणी गाळून व उकळून प्यावे. शिळे व उघडया-वरचे अन्न खाऊ नये. अतिसार झाल्यास क्षारसंजीवनी मिश्रणाचा वापर करावा व अन्न सेवन चालू ठेवावे. या रोगाकरिता प्रतिबंधात्मक लस उपलब्ध नाही. साथीचा रुग्ण आढळल्यास त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. | हस्तांदोलन अथवा आलिंगन. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे. डॉक्टरांच्या सल्लाशिवाय औषध घेणे व आजारी मुलांना शाळेत पाठवणे, या गोष्टी टाळा. या रोगाकरिता प्रतिबंधात्मक लस उपलब्ध आहे. | दूषित पाणी, माती किंवा भाज्यांशी संपर्क टाळणे, दूषित पाण्याशी संपर्क ठेवणे अपरिहार्य असल्यास रबरी बूट, हातमोजे वापरणे. या रोगाकरिता प्रतिबंधात्मक लस उपलब्ध नाही. |

अ) जवळचे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र
ब) माता बाल रुग्णालय, बेलापूर : २७५७ ७०९१
क) माता बाल रुग्णालय, तुर्भे :
ड) सार्वजनिक रूग्णालय वाशी : दूरध्वनी क्र. २७८९ ९९०१/२/३/४/५/६
इ) सार्वजनिक रूग्णालय नेरूळ : २७७०१८०८
ई) सार्वजनिक रुग्णालय ऐरोली : २७७९९८८१

उपरोक्त आजारांची लक्षणे आढळल्यास जवळच्या रुग्णालयास भेट द्यावी व त्वरित उपचार घ्यावा. ○ स्वच्छ नवी मुंबई, निरोगी नवी मुंबई